तरुण भारत

# पंचवार्षिक बृहत आराखड्यातील शिल्लक बिंदूसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करा

- महाविद्यालयांसह नवीन महाविद्यालय सुरु करणाऱ्यांना विद्यापीठाचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

तरुण भारत संवाद



विद्यापीठातून

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ हा पंचवार्षिक बृहत आराखडा शासनास पाठविलेला आहे. त्याला शासनाची मान्यता मिळाली असून शासनाच्या धोरणानुसार प्रतिवर्षाचा वार्षिक बृहत आराखडा हा पंचवार्षिक बृहत आराखड्यातील बिंदू घेवून बनविला जातो. त्यामुळे बृहत आराखड्यातील शिल्लक बिंदूसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे महाविद्यालयांसह ज्यांना नवीन शिक्षण संस्था सुरू करावयाची आहे यांना करण्यात आले आहे.

सन २०२६-२७ चा वार्षिक बृहत आराखडा सध्या तयार केलेला आहे. व तो विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation/ Affiliation Tö2 Information/ List या लिंकवर ठेवण्यात आलेला आहे. त्यामध्ये सन २०२६-२७ साठीचे शासनास शहर व तालुका निहाय अभ्यासक्रमानुसार बिंदू दर्शविण्यात आलेले आहेत. तसेच सध्या संबंधित शहर व तालुक्यामध्ये कोणती महाविद्यालये आहेत आणि त्यामध्ये कोणते अभ्यासक्रम सुरु आहेत, यांची माहिती दिलेली आहे. त्याच बरोबर पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये शिल्लक बिंदू त्या तक्त्यामध्ये नमूद केलेले आहेत.

जर आपणास शिल्लक बिंदूमधून नियमानुसार एखादा बिंदू घ्यावयाचा असल्यास आपण शिवाजी विद्यापीठातील कुलसचिवांच्या नावाने तातडीने अर्ज करावायचा आहे. हा अर्ज १५ जुलैपर्यंत विद्यापीठ कार्यालयास संलग्नता टी -२ विभागात जमा करावयाचा आहे.

पुढारी

# पंचवार्षिक बृहत्आराखड्यातील शिल्लक बिंदूंसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**कोल्हापूर :** पंचवार्षिक बृहत्आराखड्यातील शिल्लक बिंदूंसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाने केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ हा पंचवार्षिक बृहत्आराखडा शासनास पाठविला आहे. त्याला शासनाची मान्यता मिळाली असून शासनाच्या धोरणानुसार प्रतिवर्षाचा वार्षिक बृहत्आराखडा हा पंचवार्षिक बृहत् आराखड्यातील बिंदू घेऊन बनविला जातो. २०२६-२७ चा वार्षिक बृहत् आराखडा सध्या तयार केलेला आहे व तो विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation/Affiliation T-2 Information/ List या लिंकवर ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये २०२६-२७ साठीचे शासनास शहर व तालुकानिहाय अभ्यासक्रमानुसार बिंदू दर्शविण्यात आलेले आहेत. सध्या संबंधित शहर व तालुक्यामध्ये कोणती महाविद्यालये आहेत आणि त्यामध्ये कोणते अभ्यासक्रम सुरू आहेत, यांची माहिती दिली आहे. त्याचबरोबर पंचवार्षिक बृहत्आराखड्यामध्ये शिल्लक बिंदू त्या तक्त्यामध्ये नमूद केले आहेत. शिल्लक बिंदूमधून नियमानुसार एखादा बिंदू घ्यावयाचा असल्यास कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ यांच्या नावे अर्ज करू शकतो, असे उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव यांनी कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष

0 9 JUL 2025
सकाळ

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ पंचवार्षिक बृहत आराखड्याबाबत आवाहन

कोल्हापूर, ता. ८ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ हा पंचवार्षिक बृहत आराखडा शासनास पाठविलेला आहे. त्याला शासनाची मान्यता मिळाली असून, शासनाच्या धोरणानुसार प्रतिवर्षाचा वार्षिक बृहत आराखडा हा पंचवार्षिक बृहत आराखड्यातील बिंदू घेऊन बनविला जातो. त्यासाठी शिक्षण संस्था, महाविद्यालयांनी १५ जुलैपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाने केले आहे.

विद्यापीठाने २०२६-२७ चा वार्षिक बृहत आराखडा सध्या तयार केला आहे. त्यामध्ये शासनाला शहर आणि तालुकानिहाय अभ्यासक्रमानुसार बिंदू दर्शविण्यात आले आहेत. तसेच सध्या संबंधित शहर व तालुक्यामध्ये कोणती महाविद्यालये आहेत आणि त्यामध्ये कोणते अभ्यासक्रम सुरू आहेत याबाबतची माहिती दिली आहे. त्याचबरोबर पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये शिल्लक बिंदू त्या तक्त्यामध्ये नमूद केले आहेत. जर शिल्लक बिंदूमधून नियमानुसार एखादा बिंदू घ्यावयाचा असल्यास कुलसचिव यांच्या नावाने अर्ज करावेत. अर्ज १५ जुलैपर्यंत विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी-२ विभागास) देण्यात यावे. विलंबाने प्राप्त होणाऱ्या अर्जांवर कार्यवाही केली जाणार नाही, अशी माहिती उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव यांनी दिली आहे.

लोकमत

# शिल्लक बिंदू घेण्यासाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते२०२८-२९ या शिवाजी विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्याला शासनाची मान्यता मिळाली असून शासनाच्या धोरणानुसार प्रतिवर्षाचा वार्षिक बृहत आराखडा हा पंचवार्षिक बृहत आराखड्यातील बिंदू घेऊन बनविला जातो. २०२६-२७ चा वार्षिक बृहत आराखडा सध्या तयार केला असून विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation/ Affiliation T-2 Information/ List या लिंकवर तो ठेवला आहे. त्यामध्ये सन २०२६-२७ साठीचे शासनास शहर व तालुकानिहाय अभ्यासक्रमानुसार बिंदू दर्शविले आहेत. सध्या संबंधित शहर व तालुक्यामध्ये कोणती महाविद्यालये आहेत, त्यामध्ये कोणते अभ्यासक्रम सुरू आहेत यांची माहिती दिली आहे. शिल्लक बिंदू तक्त्यामध्ये नमूद केले आहेत. जर शिल्लक बिंदूमधून नियमानुसार एखादा बिंदू घ्यावयाचा असल्यास येत्या १५ जुलैपर्यंत कुलसचिवांच्या नावे अर्ज करावेत, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
09 JUL 2025



# पंचवार्षिक बृहत आराखड्यातील शिल्लक बिंदूंसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज ):**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ हा पंचवार्षिक बृहत आराखडा शासनास पाठविलेला आहे. त्याला शासनाची मान्यता मिळाली असून शासनाच्या धोरणानुसार प्रतिवर्षाचा वार्षिक बृहत आराखडा हा पंचवार्षिक बृहत आराखड्यातील बिंदू घेवून बनविला जातो.

सन २०२६-२७ चा वार्षिक बृहत आराखडा सध्या तयार केलेला आहे. व तो विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर -ffiliation/ -ffiliation T-2 Information/ List या लिंकवर ठेवण्यात आलेला आहे. त्यामध्ये सन २०२६-२७ साठीचे शासनास शहर व तालुका निहाय अभ्यासक्रमानुसार बिंदू दर्शविण्यात आलेले आहेत. तसेच सध्या संबंधित शहर व तालुक्यामध्ये कोणती महाविद्यालये आहेत आणि त्यामध्ये कोणते अभ्यासक्रम सुरु आहेत, यांची माहिती दिलेली आहे. त्याच बरोबर पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये शिल्लक बिंदू त्या तक्त्यामध्ये नमूद केलेले आहेत. जर आपणास शिल्लक बिंदूमधून नियमानुसार एखादा बिंदू घ्यावयाचा असल्यास आपण मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे अर्ज करु शकता. सदर अर्ज हे तातडीने करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात येत आहे. तेव्हा सदरचे अर्ज दिनांक १५/०७/२०२५ पर्यंत विद्यापीठ कार्यालयास (संलग्नता टी - २ विभागास) देण्यात यावे.

विलंबाने प्राप्त होणाऱ्या अर्जांवर कार्यवाही केली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव यांनी कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JUL 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
Mob -9175089600

# संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात नाट्य कार्यशाळा

कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज ):

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे २ ते ७ जुलै २०२५ रोजीनाट्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या नाट्य कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण १६ विद्यार्थ्यांनी या नाट्य कार्यशाळेचा लाभ घेतला.

कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी जितेंद्र देशपांडे आणि अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी श्री. जितेंद्र देशपांडे यांनी संहिता निवड ते सादरीकरणापर्यंतचे विविध टप्पे विविध उदाहरणांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यशाळेच्या दुसर्‍याख व शेवटच्या दिवशी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, दिल्ली येथून नाट्य प्रशिक्षण घेतलेले प्रसिद्ध नाट्य व चित्रपट कलाकार सलीम मुल्ला यांनी अभिनयातील बारकावे याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी अभिनयासाठी आवश्यक वेगवेगळ्या



सराव पद्धती उपस्थितांना शिकविल्या. कार्यशाळेच्या तिसर्‍या दिवशी प्रसिद्ध नाट्य अभिनेत्री डॉ. राजश्री खटावकर यांनी अभिनय म्हणजे काय?, अभिनयाची तोंडओळख या विषयांवर तर, चौथ्या दिवशी प्रसिद्ध रंगकर्मी व नाट्य प्रशिक्षक डॉ. संजय तोडकर यांनी नाटकातील तांत्रिक गोष्टींची तोंडओळख या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेची आयोजनाची जबाबदारी विकास कांबळे व मल्हार जोशी यांनी सांभाळली. कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई व इतर मान्यवरांच्या हस्ते नाट्य कार्यशाळेसाठी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. संजय तोडकर, राज पाटील, रविदर्शन कुलकर्णी, किरणसिंह चव्हाण, सलीम मुल्ला आदी शिक्षक व रंगकर्मी उपस्थित होते.

पुढारी



# संगीत, नाट्यशास्त्र अधिविभागात नाट्य कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे घेण्यात आलेल्या नाट्य कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १६ विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला. कार्यशाळेचे उद्‌घाटन ज्येष्ठ रंगकर्मी जितेंद्र देशपांडे व अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी देशपांडे यांनी संहिता निवड ते सादरीकरणापर्यंतचे विविध टप्पे विविध उदाहरणांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, दिल्ली येथून नाट्य प्रशिक्षण घेतलेले प्रसिद्ध नाट्य कलाकार सलीम मुल्ला यांनी अभिनयातील बारकावे याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी अभिनयासाठी आवश्यक वेगवेगळ्या सराव पद्धती उपस्थितांना शिकविल्या. कार्यशाळेच्या तिसऱ्या दिवशी प्रसिद्ध नाट्य अभिनेत्री डॉ. राजश्री खटावकर यांनी अभिनय म्हणजे काय व अभिनयाची तोंडओळख या विषयावर तर चौथ्या दिवशी रंगकर्मी व नाट्य प्रशिक्षक डॉ. संजय तोडकर यांनी नाटकातील तांत्रिक गोष्टींची तोंडओळख याविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे संयोजनाची जबाबदारी विकास कांबळे व मल्हार जोशी यांनी सांभाळली. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी राज पाटील, रविदर्शन कुलकर्णी, किरणसिंह चव्हाण, सलीम मुल्ला आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात नाट्य कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित नाट्य कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेचे उद्‌घाटन ज्येष्ठ रंगकर्मी जितेंद्र देशपांडे, अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, दिल्ली येथून प्रशिक्षण घेतलेले कलाकार सलीम मुल्ला, तिसऱ्या दिवशी अभिनेत्री डॉ. राजश्री खटावकर, चौथ्या दिवशी नाट्य प्रशिक्षक डॉ. संजय तोडकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळा आयोजनाची जबाबदारी विकास कांबळे, मल्हार जोशी यांनी सांभाळली. यावेळी राज पाटील, रविदर्शन कुलकर्णी, किरणसिंह चव्हाण आदी उपस्थित होते.

0 9 JUL 2025

पुण्यनगरी



क्रांतिकारी शोध

# आंतरजालाची निर्मिती!

डॉ. व्ही.एन. शिंदे

काही वर्षांपूर्वीपर्यंत पत्र येणे म्हणजे आनंदाचा क्षण असायचा. लोक पोस्टमनची आतुरतेने वाट पाहायचे. आपले पत्र यावे असे प्रत्येकाला वाटे. सीमेवरचा जवान असो, मुले शिकायला, नोकरीला दूरगावी असणाऱ्या कुटुंबातील माता-भगिनी; पोस्टमनने यावे आणि आपल्या नातलगाची ख्यालीखुशाली कळावी असे वाटे. मात्र पुढे फोन आले, फोन पाठोपाठ पेजर आणि नंतर मोबाईल आले आणि संपर्क साधण्याचा मार्ग सोपा झाला. त्यातच आंतरजालाचे आगमन सर्व प्रकारच्या संवादासाठीचे अत्यंत उपयुक्त साधन बनले. आज नेटवर्क नसणे म्हणजे माणसाला हातपाय गळाल्यासारखे वाटते.

आंतरजालाची म्हणजेच इंटरनेटची कल्पना १९६२ मध्ये अमेरिकेतील एमआयटी विद्यापीठातील प्राध्यापक जे. सी. आर. लिकलायडर यांच्या मनात आली. संगणक तोपर्यंत अमेरिकेसारख्या देशात समाजातील अनेक घटकांपर्यंत पोहोचला होता. लोक त्याचा वापर करू लागले होते. हेच संगणक एकमेकांना जोडता आले तर... ही मूळ संकल्पना लिकलायडर यांची होती. अमेरिकेत संरक्षण खात्याला उपयुक्त असणाऱ्या संशोधनासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असे. लिकलायडर यांनीही अमेरिकन संरक्षण दलासाठी हे संशोधन कसे उपयुक्त ठरू शकेल, हे दाखवत यासाठी पैसे मागितले. त्यांना तो प्रकल्प मंजूरही झाला. त्यातून अर्पानेट हे पहिले आंतरजाल तयार केले. सुरुवातीच्या काळात हे काम टेलिफोन तारांच्या माध्यमातून साध्य करण्यात आले. यामध्ये दोन संगणकांच्या माध्यमांतून सर्व प्रकारचा संवाद अपेक्षित होता. पुढे १९६५ मध्ये याच संस्थेतील संशोधक लॉरेन्स रॉबर्ट यांनी मॅसॅच्युसेटस आणि कॅलिफोर्निया या दोन टोकांवरील विद्यापीठांना जोडणारे नेटवर्क निर्माण केले. यातून दोन संगणक प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधण्याची लिकलायडर यांची संकल्पना अस्तित्वात येण्याची चिन्हे दिसू लागली.

यासाठी संवादशील संगणक परस्परांना जोडणे आवश्यक होते. असे सर्व संगणक परस्परांना जोडायचे तर जगभर नुसते तारांचे जाळे झाले असते. हे टेलिफोन कॉल करणे, परस्परांशी संवाद साधणे आणि नंतर तो कॉल संपवणे यासारखेच होते. त्या काळात अमेरिकेतील संगणकही असे परस्परांना जोडलेले नव्हते. यावर एमआयटीतील संशोधक लिओनार्ड क्लाईनरॉक यांनी कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधकांच्या सहाय्याने पॅकेट स्विचिंग तंत्रज्ञान विकसित केले. जी माहिती एका संगणकाकडून दुसऱ्या संगणकापर्यंत पोहोचवायची आहे, त्या माहितीची छोटी पाकिटे तयार करून ती पाठवायची, अशी ती संकल्पना. ही पाकिटे योग्य संगणकापर्यंत पोहोचवण्यासाठी राउटर हा पोस्टमन बनला. अशा राउटरची यंत्रणा म्हणजेच आंतरजाल किंवा इंटरनेट. प्रत्येक संगणक हा एकाच तारेने जोडलेला असतो. राउटर माहिती पाठवणाऱ्या संगणकाला माहिती कोणत्या संगणकापर्यंत पोहोचवायची आहे ते सांगतो. पहिला राऊटर आणि नंतरचे राउटर, नेमका पत्ता पाहतात आणि ती योग्य आणि अचूक ठिकाणी पोहोचवतात.

हे तंत्रज्ञान विकसित झाल्यानंतर १९६६ मध्ये रॉबर्टस संरक्षण दलाकडे गेला आणि अर्पानेट प्रकल्पाला गती मिळाली. आंतरजालाची शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, पत्रकारिता, कला, वाणिज्य इत्यादी क्षेत्रातील महत्त्व ओळखून अनेक उद्योजकांनी या क्षेत्रात गुंतवणूक करायला प्राधान्य दिले, त्यामुळे केवळ संरक्षण दलासाठी नाही तर समाजासाठी, सर्वांसाठी अशी यंत्रणा विकसित करण्यास सुरुवात झाली आणि अर्पानेटचे इंटरनेट झाले. अगदी सुरुवातीला अमेरिकेतील चार विद्यापीठे आणि संरक्षण दलातील काही संगणक या जाळ्यात घेण्यात आले. दरवर्षी यात भर पडत गेली. १९७१ पर्यंत अमेरिकेतील अनेक विद्यापीठे यामध्ये जोडण्यात आली. या क्षेत्राचे महत्त्व जास्तच स्पष्ट दिसू लागले. यामध्ये बोल्ट बर्नाक अँड न्यूमन इनकॉर्पोरेशन कंपनीही सहभागी झाली. पुढे नासा, इलिनॉय विद्यापीठ अशा संशोधन आणि शिक्षण संस्थाही जोडल्या गेल्या.

यातच १९७२ मध्ये रे टॉमलिन यांनी इ-मेल म्हणजेच विरोप सुविधा आंतरजालामध्ये समाविष्ट केली. आता आंतरजाल प्रगल्भ होऊ लागले. विद्यापीठाच्या पाठोपाठ ग्रंथालये, प्रयोगशाळा आंतरजालामध्ये सहभागी होऊ लागल्या. संवादसंकेताच्या म्हणजेच प्रोटोकॉल्सच्या शोधानंतर खऱ्या अर्थाने संवादसाधन सहज आणि सर्वदूर झाले, त्यामुळे आंतरजालाचा प्रसार जगभर वेगाने झाला. १९८० पासून अमेरिकन संरक्षण दलाने खऱ्या अर्थाने इंटरनेटचा संवादसंकेतासह मोठ्या प्रमाणात वापर सुरू केला. याच वर्षात संगणक आंतरजाल खाजगी क्षेत्रांनाही उपलब्ध करून देण्यात आले. भारतातही या तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेऊन १९८६ मध्ये शैक्षणिक आणि संशोधन कार्यासाठी संगणक आंतरजाल उपलब्ध करून देण्यात आले. तरीही भारतात इंटरनेट सर्वांपर्यंत पोहोचण्यास १९९५ साल उजाडावे लागले.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

लवकरच अमेरिकेत वर्ल्ड वाईड वेब संकल्पना अस्तित्वात आली. त्यातून आपल्या कंपनीची, संस्थेची, व्यवसायाची आणि वैयक्तिक संकेतस्थळे अस्तित्वात येऊ लागली. इंटरनेट हे सर्व कारणांसाठी उपयुक्त असल्याचे दिसून आल्याने प्रत्येकाने आपल्या फायद्यासाठी या क्षेत्रातील तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आणि आजचे आंतरजाल विश्व अवतरले. यामध्ये सुरुवातीला विरोपापुरते (ई-मेल) संवादमाध्यम होते, ते आता व्हिडीओ कॉन्फरन्सपर्यंत विकसित झाले आहे. यासाठी आंतरजालात गतिमानता आणणे गरजेचे होते; यासाठी उपग्रहांनी मोठी मदत केली. उपग्रहाच्या सहाय्याने आंतरजाल जोडणे शक्य झाल्याने गतिमानता आली. त्याचसोबत विविध ॲप्लिकेशन्स विकसित होऊ लागली. युट्यूब, फेसबुक, इन्स्टग्राम, ट्विटर आताचे एक्स, टेलिग्राम, व्हॉट्सॲप अशा अनेक ॲप्लिकेशन्सनी आंतरजालाच्या सहाय्याने आपला विकास साधत आंतरजालामध्ये प्रवेश केला आणि ती समाजमाध्यमांच्या रूपातून लोकांच्या गळ्यातील ताईत बनली.

आंतरजालाच्या विकासासोबत या ॲप्लिकेशन्सनी लोकप्रियता मिळवल्याने आंतरजालाचा वापर ही आता लोकांची सवय आणि गरज बनले. त्यातून आता पत्ता विचारण्यासाठी लोकांशी संवाद साधण्यापेक्षा गुगल मॅप अधिक विश्वासार्ह वाटू लागले. त्यासाठी लोकांना डाटा महत्त्वाचा वाटू लागला. 'आटा'पेक्षा लोक 'डाटा' खरेदी करण्यास प्राधान्य देऊ लागले. आंतरजालामध्ये खरी क्रांती आणली ती गुगलने, गुगल सर्च इंजिनने जगातील सर्व माहिती एकत्र आणायला सुरुवात केली. आंतरजालामध्ये आलेल्या प्रत्येक माहितीची पडताळणी करून एखाद्या वापरकर्त्याने विचारलेली माहिती या शोधयंत्रातून उपलब्ध होऊ लागली. त्यानंतर विकीपिडिया हा इनसायक्लोपिडियाच्या धर्तीवर विकसित झाला आणि ज्ञानक्षेत्रामध्ये माहितीचे भांडार खुले झाले. आंतरजालाचे तंत्रज्ञान हे गरजेतून विकसित झाले. एक संवादाचे माध्यम म्हणून विकसित झाले. मात्र, आज ते मनोरंजनाचे साधन बनले आहे. या ॲप्लिकेशनचा वापर अतिशय घातक पद्धतीने होत आहे. यातून एखाद्याचे समाजातील स्थान आणि सन्मान संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अपप्रचार करून एखाद्याला समाजात बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. त्याचबरोबर अनेक लोकांचा मोठा वेळ या माध्यमांच्या वापरात वाया जातो. अनेक फसवणारे गेम आणि डिजिटल अरेस्टच्या माध्यमांतून आर्थिक लुटीच्या घटनांमुळे आंतरजाल शाप की वरदान असा प्रश्न निर्माण होत आहे.

vilasshindevs44@gmail.com

संपर्क : ९६७३७८४४००